# नियमित दिवाणी दावा क्रं.११६/२०१७ मधील अर्ज (नि.३६) वरील आदेश

CNR: MHST14-001304-2017

जालींदर सस्ते. वि. दिलीप शिंदे.

वादीतर्फे दाखल अर्ज (नि.३६) वाचला. प्रतिवादी क्रं. १ ते ६, ९ तर्फे म्हणणे (नि.३८) वाचले. वादी व प्रतिवादी क्रं. १ ते ६, ९ तर्फे विधीज्ञांचे युक्तीवाद ऐकले. कागदपत्रे तपासली.

२. वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादींविरुध्द मनाई हुकुम मिळणेकरीता दाखल केला आहे. वादीचे गट नं.२९४ मध्ये घर व जमिन आहे. सदर गट नंबरमध्ये जाणेयेणेसाठी गट नं.२९७ मधून दक्षिण बाजुने रस्ता आहे. गट नं.२९७ मध्ये प्रतिवादींचे घर आहे. प्रतिवादी सदर रस्त्यावर बाथरुममधील पाणी सोडणे, जळण टाकणे, भांडी धुणे असे करुन वादींना त्रास देत आहेत. सबब, सदर मिळकतीची खरी वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणेकामी कोर्ट कमिशनर यांची नेमणुक होवुन तसा वस्तुस्थितीदर्शक अहवाल देणेकामी प्रतिवादी यांनी मागणी केली आहे व अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

३. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जावर नि.३८ येथे म्हणणे देवुन, नि.३६ मधील सर्व कथने खोटी व लबाडीची असल्याचे सांगितले. वादीच्या कथनाप्रमाणे त्यांचे घराकडे जाणे-येणेसाठी रसता अस्तित्वात नाही. प्रतिवादींनी घराच्या भोवती व रस्त्यावर बाथरुममधील पाणी सोडणे, जळण टाकणे, भांडी धुणे अशा स्वरुपाचे अतिक्रमण केले नाही. प्रस्तुत अर्ज चालण्यास पात्र नाही. वादी सदरच्या अर्जाद्वारे पुरावा गोळा करण्याचा प्रयत्न करत असल्याचे सांगितले. दि.२१/१२/२०१५ रोजी दावा मिळकतींसह वादींच्या इतर मिळकतींची अधिकृत मोजणी उप अधिक्षक भूमि अभिलेख, फलटण यांनी केलेली आहे. सदर नकाशा केसकामी दाखल आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार वादीने सदर दावा गट नं.२९४, २९५ व २९६ बाबत केला असून, प्रतिवादी म्हणजेच गट नं.२९७ चे धारक दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करतात, असे वादीचे कथन आहे. तसेच, गट नं.२९७ मधून गट नं.२९४ व २९५ मध्ये जाणे-येणेसाठी रस्ता जातो. वादीने सदरचा अर्ज दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकता यावे, यासाठी केला आहे. सबब, वादीचा नि.३६ चा अर्ज फेटाळणेची विनंती केली.

४. वादी व प्रतिवादींची कथने, दाव्याचे व बचावाचे स्वरुप विचारात घेता, वादी व प्रतिवादी यांचेमधील वाद हा निरंतर ताकीदीचा व अतिक्रमणाचा आहे. वादीने प्रस्तुत

दाव्यात व अर्जामध्ये अतिक्रमणाबाबत केलेले कथन हे संदिग्ध स्वरुपाचे असून, त्यातून स्पष्ट बोध नाही. प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये म्हणजेच गट नं.२९४, २९५ व २९६ मध्ये कशा स्वरुपाचे अतिक्रमण केले आहे, याबाबत वादीने सदर अर्जात नमुद केलेले नाही. तसेच अतिक्रमणाचे मोजमाप, दिशा नमुद केलेले नाही. वादीने गट नं.२९७ चे कोर्ट कमिशन व्हावे अशी विनंती प्रस्तुत अर्जात केली आहे. गट नं.२९७ हा प्रतिवादींचे मालकीचा आहे, ही बाब वादींना मान्य आहे. गट नं.२९७ ही दावा मिळकत नाही. वादीचे म्हणणे असे आहे की, गट नं.२९७ मधून दक्षिण बाजुने गट नं.२९४ मध्ये जाणेसाठी रस्ता जातो. प्रतिवादींनी नि.२६ येथे दि.२१/१२/२०१५ रोजी झालेली मो.र.नं.३७७६, ३७८५, ३७८४, ३७८२ वादीने केलेल्या मोजणी नकाशाची प्रत दाखल केलेली आहे. त्याचे अवलोकन केले असता, गट नं.२९७ चे दक्षिण बाजुला रस्ता दिसून येत नाही. वादीने नि.४० येथे गट नं.२९६ चा मोजणी नकाशा प्रत दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दि.२७/१२/१९९६ रोजी गट नं.२९६ अधिकृत मोजणी झालेली आहे. दाव्याचे स्वरुप पाहता वादीने मागीतलेली दाद ही इजमेंट हक्काबाबत असल्याचे दिसून येते. परंतु, तसे कथन वादीने दाव्यात अथवा अर्जामध्ये केलेले नाही.

५. प्रतिवादीचे विधीज्ञ श्री.आर.आच.कर्णे यांनी त्यांची भिस्त खालील न्यायनिवाडयावर ठेवली.

1. **Efigenio dias and anr. Vs. Malaquial D'costa and ors. (2000 (2) Civil Court Cases 559 (Bom))**

2. **Smt.Nalubai Narayan Shinde and ors. Vs Gopinath Dagadu Shinde. (2011 (2) Mh.L.J.991)**

3. **Sanjay S/o. Namadev Khandare Vs Sahebrao S/o. Kacharu Khandare and ors. (2001 (2) Mh.L.J.959)**

4. **Syed Mushtaque Ahmad S/o. Syed Ismail and ors. Vs. Syed Ashique Ali Khan S/o. Haidar Ali Khan. (2011 (6) Mh.L.J.334)**

६. वरील न्यायानिवाडयाचे अवलोकन केले असता, प्रस्तुत दाव्यामधील वस्तुस्थिती व वर उल्लेखीत केलेल्या न्यायनिवाडयामधील वस्तुस्थिती सुसंगत आहे, त्यामुळे माझ्या मते

वर नमुद केलेले न्यायनिवाडे हे प्रतिवादीच्या कथनाला पुष्टी देणारे आहेत. याऊलट वादीने त्याचे कथनाचे पुष्ठयर्थ न्यायनिवाडे अभिलेखावर दाखल केलेले नाहीत.

७. अभिलेखाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, वादीचा नि.५ येथील तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज हा प्रलंबित आहे. तरी सदरचा अर्जावरुन वादींचा दाव्याचे कामकाज लांबविणेचा हेतू स्पष्ट होतो. सबब, प्रस्तुत अर्ज मंजुर होणेस पात्र नाही. सबब, या सर्व बाबी विचारात घेता, अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे. या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

अर्ज (नि.३६) नामंजूर करणेत येतो.

फलटण.
दिनांक- २७/०१/२०२०. (के.के.पाटील.)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, फलटण.